# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/11/2022 (बुधवार) सकाळ

## चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०.५ कि.मी. अंतरावरील स्नेह नगर, मौदा येथे दिनांक १४/११/२०२२ चे १०.०० वा. ते १२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— शंभु कुमार गुप्ता, वय ४० वर्ष, रा. बहसी पो. कादिलपुर याला नमुद घटनावेळी कंपनीतील रूपेश येनूरकर याने फोनव्दारे माहिती दिली की, गेस्ट हाऊसच्या बाजुला ठेवलेला मुद्देमाल चोरी झाला आहे असे सांगितले असता गेस्ट हाऊसच्या जागेवर जावुन पाहिले असता तेथील ठेवलेला लोखंडी ६० डाया पाईप २८ नग, लोखंडी आर्म चेअर १५ नग व गेस्ट हाउसच्या बालकनितले लोखंडी जॅक १५ नग असा एकुण २,००,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत १४ कि.मी. अंतरावरील मौजा राहूल गॅस एजेंसी, बाजार चौक, गोंडखैरी वार्ड क्र. ०२ कळमेश्वर येथे दिनांक १५/११/२०२२ चे १८.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— सलीम इब्राहीम कुरेशी, वय ३२ वर्ष रा. गोंडखैरी बस स्टॅन्ड जवळ, वार्ड क्र. ०३ हा ॲक्टीव्हा गाडी घेवुन आपले मुलासोबत राहुल गॅस एजेंसी बाजार चौक, वार्ड क्र. २ गोंडखैरी येथे गेले असता यातील आरोपी एजेंसी मालक नामे— अमित रविंद्र लोढे याने गॅस देण्यास नकार दिल्याने यातील फिर्यादी याने आरोपीस ''तुझी तक्रार करतो'' असे म्हटले असता यातील आरोपी एजेंसी मालक आरोपी अमित लोढे याने फिर्यादीला शिवीगाळ करून सायकलमध्ये हवा भरणाऱ्या पंपाने डोक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कळमेश्वर करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**